गोवादूत : पणजी – बुधवार, दि. १० डिसेंबर २०१४

# हळबे महाविद्यालयात विष्णू वाघांची काव्य मैफल

**दोडामार्ग** (प्रतिनिधी) : येथील नवनिर्माण शिक्षण संस्थेच्या लक्ष्मीबाई सीताराम हळबे महाविद्यालयात शनिवार दि. १३ डिसेंबर रोजी सकाळी ९ वा. गोमंतकालीन सुप्रसिद्ध नाटककार व प्रतिभावंत कवी आमदार विष्णू सूर्या वाघ यांच्या मराठी, कोकणी व मालवणी भाषेतील काव्य मैफलीचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. महाविद्यालयातील मराठी भाषा व वाङ्‌मय मंडळाच्यावतीने हा कार्यक्रम होणार आहे. विद्यार्थ्यांमध्ये मराठी भाषा व साहित्याविषयी आवड निर्माण व्हावी, मराठी भाषा वृद्धिंगत व्हावी हे उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेवून विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येते. या कार्यक्रमासाठी जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी व परिसरातील काव्यप्रेमींनी उपस्थित राहून वाघ यांच्या काव्य प्रतिभेचा आस्वाद घ्यावा, असे आवाहन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. व्ही. ए. पाटील यांनी केले आहे.